# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९९३ /२०२४ दि. ०२/१०/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उप विभागाच्या हद्दीत दि. ०३/१०/२०२४ ते दि. १२/१०/२०२४ या कालावधीत **नवरात्रौत्सव व दसरा** हे सण साजरे होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) गुजरात महामार्गाने ठाणे घोडबंदर रोडच्या दिशेने येणा–या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **चिंचोटी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

२) मुंबई, वसई, विरार कडून घोडबंदर रोडच्या दिशेने येणा–या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **फाउंटन हॉटेल** जवळ **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

३) घोडबंदर रोडने ठाणे कडे येणा–या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **गायमुख जकात नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** गुजरात, मुंबई, विरार, वसई, कडून घोडबंदर रोडच्या दिशेने येणारी सर्व प्रकारची जड अवजड वाहने चिंचोटी नाका येथून कामण – अंजुर फाटा – माणकोली भिवंडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. १२/१०/२०२४ रोजी दुपारी १४.०० वा. ते सार्वजनिक तसेच खाजगी नवरात्र देवी मूर्ती, घट आणि फोटो/प्रतिमा यांचे विसर्जन कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतुक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मूर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्दीस देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/ वि.शा. ठाणे

CamScanner

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—**
**प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे**
**परिवहन व्यवस्थापक, ठाणे**
**नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे**

**प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर**
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे**
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत :—** सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. कासारवडवली, कापुरबावडी, वागळे वाहतूक उपविभाग ठाणे
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner

Google Maps Chinchoti Naka

चिंचोटी नाका प्रवेश बंद




नागला बंदर जायकरिता U turn करता येते



फाउंटन हॉटेल प्रवेश बंद

# Chinchoti Naka

चिंचोटी नाका

कामणरवली (पर्यायी मार्ग) जड अवजड वाहनासाठी

4.1 ★★★★ (55)

Bus stop

Overview Reviews

Directions Save Nearby Send to phone Share

Vasai-Virar, Chinchoti, Maharashtra 401208

9VMW+7M Chinchoti, Maharashtra

Your Maps activity

CamScanner